ग्रं. सं. ठाणें
विषय विस्तार्थ
स. नं. ७३

# मराठी पुस्तकांसाठीं वर्गीकरण-पद्धति.

सेंट्रल लायब्ररी-बडोदें.

जुलै-सन १९१६.

हें पुस्तक ( ग्रंथकर्त्यांच्या नांवांची अंकानुक्रमणिका-जी सरकारी छापखान्यांत छापली आहे ती-खेरीज करून ) मे. रा. रा. जनार्दन सखाराम कुडाळकर एम्. ए., एल्एल्. बी. क्युरेटर ऑफ् स्टेट लायब्ररीज-बडोदें, यांचेकरितां रा. कृष्णराव रामचंद्र मराठे यांनीं बडोदा वत्सल छापखाना, रावपुरा पोलीस गेटासमोर-बडोदें, येथें ता. ३१ माहे जुलै सन १९१६ रोजीं छापिलें.

रा. वि. १४८२

WITH COMPLIMENTS

Curator of State Libraries.

92(6.

To B. V. Vedak Esq B.A.

# प्रस्तावना.

इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील बहुतेक सर्व पुस्तकालयांत मुख्यतः दोन वर्गीकरणपद्धति प्रचारांत आहेत व त्या सर्वमान्य झालेल्या आहेत. त्यांचीं नांवें डॉक्टर ड्युई ह्यांची 'डेसिमल' ( Decimal ) किंवा दशांश-पद्धति, व मिस्टर कटर ह्यांची 'एक्स्पँसिव' ( Expansive ) किंवा विस्तरणशीलपद्धति. ड्युईंनीं आपल्या पद्धतींत मुख्य दहा विभाग घेऊन त्याचे पुनः पुनः दहा दहा उपविभाग केलेले आहेत; व कटर ह्यांनीं A, B, C पासून Z पर्यंत मुख्य २६ ( सव्वीस ) विभाग करून त्यांचे पुनः Aa, Ab, Ac, असे आणखी प्रत्येकाचे सव्वीस उपविभाग केलेले आहेत. ह्या दोन मुख्य वर्गीकरणपद्धतीखेरीज आणखी कांहीं वर्गीकरणपद्धति इंग्लंड, अमेरिका व इतर देशांत वापरण्यांत येतात. उदाहरणार्थः— ब्राऊन, मेरिल, वगैरे; पण ह्या इतक्या लोकमान्य नाहींत. बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररींत इंग्लिश पुस्तकांसाठीं मि. बॉर्डन ह्या अमेरिकन लायब्ररी-अनांनीं एक नवीन वर्गीकरण तयार केलें. हें वर्गीकरण वरील दोन ( 'डेसिमल' व 'एक्स्पँसिव' ) सर्वमान्य वर्गीकरणांवर आधारून बसाविलेलें आहे. ह्यांत मुख्य विभाग कटर पद्धतीप्रमाणें, म्हणजे A, B, C तें Z, घेऊन त्यांचे ड्युईंच्या दशांशपद्धतीप्रमाणें दहा दहा उप-विभाग करण्यांत आलेले आहेत. कर्त्यांची अंकानुक्रमणिका ( Author Numbers ) देखील इंग्लिश ग्रंथकर्त्यांच्या नांवांप्रमाणें बॉर्डन साहेबांनींच तयार केलेली होती.

प्रस्तुत मराठी पुस्तकांची वर्गीकरणपद्धति मि. बॉर्डन ह्यांच्याच पद्धतीवरून योग्य ते फेरफार करून तयार केलेली आहे. असेंच एक वर्गी-करण रा. सी. डी. दलाल, एम् ए., सेंट्रल लायब्ररींतील एक लायब्ररीअन, ह्यांनीं गुजराथी पुस्तकांकरितां तयार केलें आहे, व तें सध्या बडोदें

राज्यांतील बऱ्याच पुस्तकालयांत प्रचारांत आहे. रा. दलालांच्या गुजराथी वर्गीकरणांत व ह्या मराठी वर्गीकरणांत कित्येक ठिकाणीं फेरफार आहेत; परंतु इतर बाबतींत दोन्हीं बहुतेक सारख्याच आहेत.

बडोदें येथील सेंट्रल लायब्ररी सर्व हिंदुस्थानांत अत्यंत पुरोगामी असल्यामुळें येथील सर्व प्रकारच्या कामांच्या माहितीची मागणी हिंदुस्थानांतील सर्व भागांतून नेहमीं येत असतें, म्हणून ही सर्व माहिती आम्हीं क्रमशः छापून प्रसिद्ध करीत आहोंत, व त्याच दृष्टीनें ही मराठी पुस्तकांची वर्गीकरणपद्धति छापिली जात आहे. ही पद्धति शास्त्रीय असल्यामुळें महाराष्ट्रांतील इतर ग्रंथालयांस मान्य होईल व सर्वत्र लवकरच प्रचारांत येईल अशी आम्हांस उमेद आहे.

ह्या पुस्तकांतील ग्रंथकर्त्यांच्या नांवांची अंकानुक्रमणिका तयार करण्याच्या कामीं रा. रा. क. प्रधान, बी. ए., व रा. वि. रा. ठकार, बी. ए. एल्एल्. बी., ह्या सेंट्रल लायब्ररींतील दोघां लायब्ररिअनांनीं बरीच मदत केली त्याबद्दल लायब्ररी खातें त्यांचे फार आभारी आहे.

बडोदें. ता. ३०-७-१९१६

ज. स. कुडाळकर,
क्युरेटर ऑफ् स्टेट लायब्ररीज, बडोदें.

५०० पर्यंत पुस्तकें असलेल्या पुस्तकालयांसाठीं

वर्गीकरण-पद्धति.

अ—सर्वसाधारण.

क—तत्वज्ञान व धर्म.

च—शास्त्र व विज्ञान.

ट—समाजशास्त्र.

त—कला हुन्नर.

प—वाङ्मय.

श—इतिहास.

क्ष—भूगोल, स्थलवर्णन, प्रवास, वगैरे.

ज्ञ—चरित्रें.

ह्या पद्धतीप्रमाणें वर्गीकरण करतांना, ज्या विषयाचें जें पुस्तक असेल तें ( विषयदर्शक ) अक्षर ( अ, क, च, ट वगैरे ) त्या पुस्तकावर लिहून त्याच विषयावर तें पांचवें पुस्तक असल्यास ५, बारावें असल्यास १२ असा अंक लिहावा, म्हणजे त्या पुस्तकाचा संपूर्ण वर्गांक ‘ अ ५ ’ किंवा ‘ अ १२ ’ किंवा ‘ ट ५ ’ वगैरे समजावा. ह्याहून विशेष निश्चित वर्गांक करणें असल्यास पुस्तकाचें विषयाक्षर ठरविल्यावर त्या पुढें त्या पुस्तकाच्या कर्त्याची जी संख्या कर्त्यांच्या अंकानुक्रमणिकेंत सांपडेल, त्या संख्येंतील पहिले दोन अंक घेऊन ते त्या विषयाक्षरापुढें लिहावे, म्हणजे त्या पुस्तकाचा पूर्ण वर्गांक तयार झाला असें समजावें. ह्या दुसऱ्या रीतीनें एकाच विषयावरील सर्व पुस्तकें त्यांच्या कर्त्यांच्या आद्याक्षरांनुक्रमानेंच रचिलीं जातात व त्यामुळें तीं शोधून काढण्यास व पुनः योग्य जागीं ठेवण्यास त्रास पडत नाहीं हा विशेष फायदा आहे.

---

संग्रह १४२



२००० पर्यंत पुस्तकें असलेल्या पुस्तकालयांसाठीं

वर्गीकरण-पद्धति.

## अ-सर्वसाधारण.

ए-बालवाचन.

ऐ-महिलावाचन.

औ-निषिद्ध व वर्ज्य पुस्तकें.

## क-तत्त्वज्ञान.

ख-मानसशास्त्र व गुप्तविद्या.

ग-नीति.

घ-धर्म-हिंदेतर.

ङ-धर्म-हिंदु.

## च-शास्त्रविज्ञान ( गणित, ज्योतिष. )

छ-आधिभौतिक शास्त्रें.

ज-जीवशास्त्र ( Biology )

झ-मानवजाति शास्त्र ( Anthropology )

ञ-वैद्यकशास्त्र.

## ट-समाजशास्त्र ( सामाजिक संस्था व चालीरीति. )

ठ-राजनीति.

ड-अर्थशास्त्र.

ढ-राजशासन व कायदा.

ण-शिक्षण.

## त-कला-हुन्नर.

थ-फौज व आरमार विषयक कला.

द-ललितकला.

ध-क्रीडा व विनोद.

न-संगीत.

## प-वाङ्मय व भाषाशास्त्र.

फ-अलंकार.

ब-काव्य, ( प्राचीन व अध्यात्मिक ).

भ-काव्य, (आधुनिक व रसिक ).

म-नाट्य.

य-कादंबरी.

र-गद्य वाङ्मय, ( निबंध, टीका वगैरे ).

ल-भाषांतरित वाङ्मय.

व-विनोदात्मक वाङ्मय.

# श-इतिहास.

**ष**-पौरस्त्य इतिहास.

**स**-भारतीय इतिहास.

**ह**-पाश्चिमात्य इतिहास.

**ळ**-अमेरिकन व अन्यदेशीय इतिहास.

# क्ष-भूगोल, स्थलवर्णन, प्रवास, वगैरे.

# ज्ञ-चरित्रें.

ह्या पद्धतीप्रमाणें वर्गीकरण करतांना पुस्तकास त्याचा विषयांचें नक्की अक्षर दिल्यावर त्यापुढें त्या पुस्तकाच्या कर्त्याच्या आद्याक्षरांची जी संख्या अंकानुक्रमाणिकेंत दिली असेल किंवा देतां येईल ती लिहावी म्हणजे पुस्तकाचा पूर्ण वर्गांक तयार झाला असें समजावें. ह्याहून विशेष पद्धतशीर वर्गांक देणें असल्यास कर्तृदर्शक संख्या ( दोन अंकी किंवा तीन अंकी घेऊन ) अंशस्थानीं लिहून पुस्ताकाच्या नांवाची संख्या त्याच्या आद्याक्षरांवरून अंकानुक्रमणिकेंतून काढून ती छेदस्थानीं लिहावी म्हणजे पुस्तकाचा संपूर्ण वर्गांक तयार झाला असें समजावें. ही ग्रंथनाम-दर्शक संख्या दोन अंकांहून अधिक असण्याची जरूरी नाहीं.

---

२००० हून अधिक पुस्तकें असलेल्या पुस्तकाल-
यांसाठीं वर्गीकरण-पद्धति.

---

# अ–सर्वसाधारण व विशेष संग्रह.

## अ–सर्वसाधारण.

आ–कोश, विश्वकोश, ज्ञानचक्र, वगैरे.

इ–बांधलेलीं मासिकें.

ई–बांधलेलीं वृत्तपत्रें.

उ–सार्वजनिक व इतर संस्थांचे अहवाल.

ऊ–सरकारी अहवाल, कागदपत्रें, खानेसुमारी, वगैरे.

ए–बालवाचन.

ऐ–महिलावाचन.

ओ–पुस्तकालयशास्त्रविषयक साहित्य.

औ–निषिद्ध व वर्ज्य पुस्तकें.

# क वर्ग–तत्त्वज्ञान व धर्म.

## क–तत्त्वज्ञान.

का–सर्व साधारण.

कि–अध्यात्मविद्या ( Metaphysics )

की–तर्क व न्याय.

कु–दर्शनें.

कू–इतर तत्त्वज्ञान मतें.

के–तत्त्ववेत्ते.

कौ–किरकोळ.

## ख–मानसशास्त्र व गुप्तविद्या.

खा–सर्वसाधारण.

खि–मन व शरीर [ स्वप्नचमत्कार, वशीकरण व मोहिनीशास्त्र ( Hypnotism ), मृतसंभाषण ( Spiritualism ), योगसमाधि, वगैरे. ]

खी–इंद्रजाल, जारणमारण, वगैरे.

## ग–नीति.

गा–सर्वसाधारण.

गि–नीतिवाद.

गी–राज्यनीति.

गु–कुटुंबनीति.

गू–व्यवसायनीति.

गे–जातिनीति ( Sexual ethics )

गै–समाजनीति.

गो–विशेष महत्त्वाचे नीतिवाद. ( उ० मदिरापाननिषेध, बालविवाह, बहुपत्नीकत्व ( Mormonism ), शाक्तपंथ, द्यूतनिषेध, वर्णभेद ( अंत्यज, गौरागौर प्रश्न Colour question), इत्यादि.

गौ–किरकोळ.

[१]

## घ–धर्म-हिंदेतर.

घा–सर्वसाधारण.

घी–.

घु–जैन.

घू–थीऑसॉफी.

घे–पारसी.

घै–महंमदी.

घो–ख्रिस्ती.

घौ–अन्य.

## ङ–धर्म-हिंदु.

ङा–सर्वसाधारण.

ङि–वैदिक ( औपनिषदिक धरून ).

ङी–स्मृति.

ङु–पुराणें ( रामायण व महाभारतासहित ).

ङू–शैव.

ङे–वैष्णव.

ङै–भागवत.

ङो–समाज, पंथ, वगैरे. ( आर्य, ब्रह्म वगैरे समाज, महानुभाव, नानक, वगैरे पंथ. )

ङौ–किरकोळ.

# च वर्ग—शास्त्र-विज्ञान.

## च-गणित व जोतिष.

चा—सर्वसाधारण.

चि-अंकगणित.

ची—बीजगणित.

चु—भूमिति.

चू—त्रिकोणमिति.

चे-

चै—पृथ्वी.

चो—आकाश.

चौ—ज्योतिष.

## छ-आधिभौतिक शास्त्र ( Physical Sciences ).

छा—सर्वसाधारण.

छि-पदार्थविज्ञान. ( Physics ).

छी—रसायन ( Chemistry ).

छु-

छू-

छे—

छै—खनिजविद्या ( Mineralogy ).

छो—भूस्तरविद्या ( Geology ).

छौ-किरकोळ.

सं. क्र. ७६२



## ज-जीवशास्त्र ( Biology ).

जा—सर्वसाधारण.

जि—

जी—वनस्पतिशास्त्र ( Botany ).

जु—प्राणिशास्त्र ( Zoology ).

जू—कीटकशास्त्र ( Entomology ).

## झ-मानवजातिशास्त्र ( Anthropology and ethnology ).

## ञ-वैद्यकशास्त्र.

ञा—सर्वसाधारण.

ञि—कायविच्छेद व कायधर्म ( Anatomy & Physiology ).

ञी—चिकित्सा ( Therapeutics ).

ञु—रोगनिदान ( Pathology ).

ञू—शस्त्रक्रिया ( Surgery ).

ञे—आरोग्यशास्त्र ( Hygiene & Sanitation ).

ञै—स्त्री-बाल-रोग.

ञो—पशुरोग.

ञौ-विशेष उपचारपद्धति व किरकोळ.

# ट वर्ग—समाजशास्त्रें.

## ट—सामाजिक संस्था व चालीरीति.

टा—सर्वसाधारण.

टि—समाजसुधारणा ( व्यक्तिविषयक ).

[ उ०-मद्यपाननिषेध, मतस्वातंत्र्य, अनेकस्त्रीविवाह, विधवाविवाह, प्रौढविवाह. ]

टी—समाजसुधारणा ( जातिविषयक ).

[ उ०-जातिभेदनिषेध, रोटीबेटीव्यवहार, ज्ञातिभोजन, इत्यादि. ]

टु—समाजसुधारणा ( समाजविषयक ).

[ उ०-पतितपरावर्तन, परदेशगमन, अंत्यजोद्धार, देवस्थान-सुधारणा, क्लब व मंडळें, स्त्रीशिक्षण, वगैरे. ]

टू—परोपकारी संस्था.

[ उ०-अनाथबालकालयें, अनाथबालिकाश्रम, सेवासदनें, पांजरापोळ, रेफर्मेटरी, प्रिझन रिफॉर्म, ॲम्ब्युलन्स व फर्स्ट एड, इस्पितळें व दवाखाने, पाणपोई, आरोग्यभुवनें, वगैरे ].

ठे—चालीरीति.

[ दागिन्याची चाल व कपड्याची फॅशन, जन्म व मृतसंस्कार, स्त्रियांचा दर्जा, पडद्याची चाल, जातिबहिष्कार, अनेकपत्नीत्व, सती, इत्यादि. ]

## ठ—राजनीति.

ठा—सर्वसाधारण.

ठि—अंतर्राष्ट्रीय व स्थानिक राजनीति.

ठी—परराष्ट्रीय राजनीति.

ठु—युरपीयन राजनीति.

ठू—ब्रिटिश राजनीति.

ठे—हिंदुस्थानची राजनीति.

ठै—अमेरिकन राजनीति.

ठो—वसाहतींतील राजनीति.

ठौ—परराष्ट्रांतील वसाहतींसंबंधीं प्रश्न, गुलामगिरी, वगैरे व किरकोळ.

## ड—अर्थशास्त्र.

डा—सर्वसाधारण.

डि—उत्पन्न, उपज, निष्पत्ति.

डी—धंदेवाले, कामकरी, मजुरी, वगैरे.

डु—सहकारिता, नफ्याची वांटणी, सामान्यस्वामित्ववाद (Socialism).

डू—व्यापार, उदीम, बाजारभाव, वगैरे.

डे—नाण्याचा व्यवहार, पेढ्या, पत, व्याज.

डै—कर.

डो—जमीनजुमला, भाडें, मालकी, वगैरे.

डौ—किरकोळ.

## ढ-राजशासन, व कायदा.

ढा—सर्वसाधारण.

ढि—राजकीय हक्क, स्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क.

ढी—राज्यशासनपद्धति.

ढु—इंग्लंडची राज्यपद्धति.

ढू—हिंदुस्थानची राज्यपद्धति.

ढे—इतर देशाची राज्यपद्धति.

ढो—कायदेकानु व पोलीस.

ढौ—किरकोळ.

## ण-शिक्षण.

णा—सर्वसाधारण शिक्षण.

णि—बालोद्यान व प्राथमिक शिक्षण.

णी—दुय्यम प्रतीचे शिक्षण.

णु—उच्च प्रतीचे शिक्षण.

णू—हुन्नर-कलांचें शिक्षण.

णे—स्त्रीशिक्षण.

णै—गृहशिक्षण.

णो—धार्मिक, नैतिक, वगैरे विशिष्ट शिक्षण.

णौ—विशेष शिक्षणप्रद्धति व संस्था.

# त वर्ग—कला, हुन्नर.

## त—उपयुक्त कला.

ता—साधारण.

ति—निष्कर्षक :( Extractive ) कला; [ म्हणजे सृष्टीच्या गर्भांतून ओढून काढण्याच्या कला. उदा०--कृषिकर्म, बागाईत, जंगलें तोडणें, खाणी खोदणें, विटा व सीमेंट बनविणें, मासे मारणें, वगैरे. ]

ती—रासायनिक कला. [ उदा०-रसायणें, धातू, रंग, रोषणी, कांचकाम, पेयें, वगैरे करणें. ]

तु—हस्तनिर्माण--कला ( Manufacturing ). [ उदा०--कापड, लोंकर, रेशीम, चामडे, रब्बर, कागद, वगैरे बनविणें. ]

तू—रचनाकला ( Constructive ). [ उदा०--एन्जीनिअरींग; घरें, रस्ते, आगगाड्या, पाटबंधारे वगैरे बांधणें; सुतारकाम व जवाहिरकाम; आगबोटी बांधणें; यंत्रें करणें, इत्यादि ]

ते—व्यापारधंद्याच्या कला. [ उदा०--धंदा, रोजगार, दळणवळण, ने-आण, हिशेब ठेवणें, जाहिराती लिहिणें, ऑफिसें शृंगारणें, वगैरे. ]

तै—लेखन व आनुंषगिक कला. [ उदा०—ग्रंथमुद्रण-प्रकाशन-विक्रय-बंधन, वृत्तपत्रव्यवसाय, लेखन, टाईपांत लिहिणें, लघुलिपि, इ.]

तो—गृहकर्म किंवा गृह्यकला (Domestic arts). [ उदा०-स्वयंपाक, शिवणटिपण, बालसंगोपन, गृह शृंगारणें, इ. ]

तौ—किरकोळ.

## थ-फौज व आरमार विषयक कला.

[ उदा०-सांग्रामिक इतिहास, शस्त्रास्त्रें, कोट किल्ल्याची रचना, व्यूहरचना, सेनाविभाजन, वगैरे. ]

## द-ललितकला.

दा—सर्वसाधारण.

दि—रमणीय उद्यानकर्म ( Landscape gardening ).

दी—गृहशिल्पकर्म ( Architecture ).

दु—मूर्तिशिल्पकर्म ( Sculpture ).

दू—चित्रालेखन ( Drawing ), व चित्रोल्लेखन ( Engraving ).

दे—रंगचित्रकर्म ( Painting ) व गृहालंकरण ( Decorating ).

दो—प्रकाशलेखन किंवा छायाचित्रकर्म अथवा फोटो घेणें. ( Photography ).

## ध-क्रिडा व विनोद.

धा—साधारण.

धि—सार्वजनिक मनरंजन (नाटक, गाणें, सिनेमा, साठमारी, वगैरे).

धी—घरांतील किंवा बैठे खेळ ( बुद्धिबळ, गंजिफा, पत्ते वगैरे).

धु—माळांवरील खेळ ( क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, वगैरे. )

धू—शिकार, अश्वकौशल्य, शर्यत, पोलो, वगैरे.

धे—शरसंधान, गोळीचा नेम धरणें, [मौजेसाठीं] मासे पकडणें, वगैरे.

धै—कसरत व मल्लविद्या.

धो—जलक्रीडा.

धौ—इतर.

### न-संगीत.

ना-सर्वसाधारण.

नि-गायन.

नी-

नु-वादन.

नू-

ने-नर्तन.

नो-पाश्चिमात्य संगीत.

नौ-( संगीताचीं उपकरणें ).

## प-वर्ग—साहित्य व वाङ्मय.

### प-भाषाशास्त्र.

पा-सर्वसाधारण.

पि-हस्तलिपि.

पी-व्युत्पत्ति.

पु-शब्दकोश ( Vocabulary ).

पू-व्याकरण.

पे-छंद ( Prosody ).

पै-ग्रंथरचना ( Composition ).

पो-तुलनात्मक भाषाज्ञान.

पौ-भाषांतर करणें.

## फ-अलंकार.

## ब-काव्यें, ( प्राचीन व अध्यात्मिक )

बा-साधारण.

बि-अति प्राचीन ( ज्ञानेश्वरी, मुकुंदराय, वगैरे ).

बु-मध्यकालीन ( वामन, मुक्तेश्वर, वगैरे ).

बे-मोरोपंती व तत्कालीन ( अनंतफंदी वगैरे ).

बो-प्राचीन पोवाडे. ( Ballad and Bardic literature ).

## भ-काव्य ( आधुनिक व रसिक ).

## म-नाट्य. ( गद्य, संगीत, रूपांतरित ).

## य-कादंबरी.

या- लहान लहान गोष्टी.

यि- सामाजिक कादंबऱ्या.

यु-ऐतिहासिक.

ये-मुलांसाठीं.

यै-स्त्रियासांठी.

यो-डिटेक्टिव्ह किंवा दोषाविष्कारक कादंबऱ्या.

यौ-इतर.

## र—गद्य वाङ्मय ( निबंध, टीका, वगैरे ).

रा—साधारण.

रि—निबंधात्मक.

री—भाषणें, वक्तृत्त्व.

रु—कागदपत्रें.

रे—टीकात्मक.

रो—नियतकालीनांतर्गत वाङ्मय.

रौ—लेखसंग्रह.

## ल-भाषांतरित वाङ्मय (समूळ अथवा मूळाशिवाय).

ला—साधारण.

लि—संस्कृतांतून.

लु—देशी भाषांतून.

ले—पाश्चिमात्य भाषांतून.

लो—पौरस्त्य भाषांतून.

## व—विनोदात्मक वाङ्मय.

# श—ळ वर्ग-इतिहास.

## श-सामान्य इतिहास.

शा—सर्वसाधारण.

शि—पुराणवस्तुसंशोधन (Archælogy ).

शी--ऐतिहासिक स्थळें.

शु--प्राचीन इतिहास.

शू--लोकप्रिय आख्यायिका, दंतकथा, वगैरे.

शे-वंशावळी.

शै-ऐतिहासिक चळवळी, संस्था, वगैरे.

शो-आधुनिक इतिहास.

शौ-किरकोळ ( कागदपत्रें, याद्या, निवाडे, वगैरे ).

## ष-पौरस्त्य इतिहास.

षा-साधारण.

षि-चीन.

षी-जपान.

षु-ज्यु लोकांचा.

षू-इराण, बॅबिलोनिया, वगैरे.

षे-तुर्कस्थान व अरबस्थान.

षै-आफ्रिका.

षो-इजिप्त किंवा मिसर देश.

षौ-इतर देश.

## स-भारतीय इतिहास.

सा-सर्वसाधारण.

सि-वैदिककाल.

सी-बुद्धकाल ( ग्रीक, सिथिअन, वगैरेंच्या स्वाऱ्या ).

मराठी ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. १२८८ ... शाखा



सु–मोंगल व मुसलमानी रियासत.

सू–मराठी रियासत व महाराष्ट्राचा इतिहास.

से–गुजराथ व सौराष्ट्र.

सै–बडोदें राज्य व गायकवाडांचा इतिहास.

सो–ब्रिटिश रियासत.

सौ–देशी राज्यें व इतर प्रांतिक इतिहास.

## ह–पाश्चिमात्य इतिहास.

हा–सर्वसाधारण.

हि–ग्रेटब्रिटन.

ही–फ्रान्स, हॉलंड, स्वित्झर्लंड.

हु–जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगरी.

हू–रोमन साम्राज्य व इटली.

हे–स्पेन व पोर्तुगाल.

है–नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन.

हो–रशिया व बाल्कन राष्ट्रें.

हौ–ग्रीस.

## ळ–आमेरिकन व अन्यदेशीय इतिहास.

ळा-साधारण ( अमेरिकन ).

ळि–कानडा.

ळु–युनायटेड स्टेटस्.

ळू–मेक्सिको.

ळे–दक्षिण अमेरिका.

ळो–वसाहतींचा इतिहास ( Colonial history ).

ळौ–दक्षिणोत्तर ध्रुव व इतर प्रदेश.

# क्ष–भूगोल, स्थलवर्णन, प्रवास.

क्षा–सर्वसाधारण, जलप्रवास वगैरे.

क्षि–नकाशे, गॅझेटिअर्स, मार्गदर्शक ( Guides ) पुस्तकें.

क्षी–युरोपखंड.

क्षु–एशिया खंड.

क्षू–हिंदुस्थान.

क्षे–आफ्रिका.

क्षै–अमेरिका ( उत्तर ).

क्षो–अमेरिका ( दक्षिण ).

क्षौ–इतर.

# ज्ञ–चरित्रें.

ज्ञा–सर्वसाधारण चरित्र संग्रह.

ज्ञि–अवतारी पुरुषांचीं चरित्रें.

ज्ञी–प्राचीन ऋषि, साधुसंत, तत्त्ववेत्ते, ह्यांचीं चरित्रें.

ज्ञु–राजधोरणी व मुत्सद्दी पुरुषांचीं चरित्रें.

ज्ञू–वीरांचीं चरित्रें.

ज्ञे-ग्रंथकार, कवी व विद्वान लोकांचीं चरित्रें.

ज्ञै-कलाकुशल लोकांचीं चरित्रें.

ज्ञो-गायकवाड घराण्यांतील स्त्रीपुरुषांचीं चरित्रें.

ज्ञौ-स्त्रियांचीं चरित्रें.

श्री.

# ग्रंथकर्त्यांच्या नांवांची अंकानुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अ | १०१ |
| अग्निहोत्री | १०२ |
| अचबल | १०३ |
| अतीतकर | १०४ |
| अत्रे | १०५ |
| | १०६ |
| अधिकारी | १०७ |
| अन्तुन | १०८ |
| | १०९ |
| अभ्यंकर | ११० |
| अमरापुरकर | १११ |
| अमृतराय कवि | ११२ |
| अम्मानतअली | ११३ |
| | ११४ |
| अलोनी | ११५ |
| | ११६ |
| अष्टपुत्रे | ११७ |
| असगेकर | ११८ |
| अस्नोडकर | ११९ |
| | १२० |
| आकर्य | १२१ |
| आ | १२२ |
| आगरकर | १२३ |
| आगाशे | १२४ |
| आचरेकर | १२५ |
| आचार्य | १२६ |
| आजगांवकर | १२७ |
| | १२८ |
| आठल्ये | १२९ |
| आठवले श्री. | १३० |
| आठवले र. | १३१ |
| | १३२ |
| आदिनाथ | १३३ |
| आनंदतनय | १३४ |
| आपटे गो. वि. | १३५ |
| चि. मो. | १३६ |
| ना. वि. | १३७ |
| ना. ह. | १३८ |
| म. चि. | १३९ |
| रा. मो. | १४० |
| वा. गो. | १४१ |
| ह. ना. | १४२ |
| | १४३ |
| आयंगार | १४४ |
| | १४५ |
| आवटे | १४६ |
| | १४७ |
| आष्टमकर | १४८ |
| आंगणें | १४९ |
| आंधारे | १५० |

| | | | |
|---|---|---|---|
| इ | १५१ | कट्टी | १७९ |
| इचलकरंजीकर | १५२ | कदम | १८० |
| | १५३ | कनिङ्ह्याम | १८१ |
| इनामदार | १५४ | कबीर | १८२ |
| | १५५ | कमलाकर | १८३ |
| इसलामपुरकर | १५६ | करकरे | १८४ |
| | १५७ | करकंबरकर | १८५ |
| उ | १५८ | करमरकर | १८६ |
| उकीडवे | १५९ | करंदीकर | १८७ |
| उदास | १६० | कर्वे | १८८ |
| उद्धवचिद्घन | १६१ | कऱ्हाडकर | १८९ |
| उपाध्ये | १६२ | कलमर्गुला | १९० |
| उपासनी | १६३ | कल्याणकर | १९१ |
| | १६४ | कवडेकर | १९२ |
| एकनाथ महाराज ए | १६५ | कवि | १९३ |
| ऐरेकर | १६६ | काकडे का | १९४ |
| ओक श्री. ओ | १६७ | काणे | १९५ |
| वा. | १६८ | काथवटे | १९६ |
| ओगले | १६९ | कानिटकर श्री. | १९७ |
| | १७० | गो. | १९८ |
| ओडमने | १७१ | वा. | १९९ |
| अं | १७२ | कान्हेरे | २०० |
| | १७३ | कापकर | २०१ |
| अंतुरकर | १७४ | कामत | २०२ |
| | १७५ | कामळे | २०३ |
| क | १७६ | कायकिणीकर | २०४ |
| कचेश्वर | १७७ | क्यांडी | २०५ |
| | १७८ | कारखाननीस | २०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कार्लेकर | | २०७ | केळुसकर | २३५ |
| कालिदास | | २०८ | को | २३६ |
| काळे श्री. | | २०९ | कोठारे | २३७ |
| म. | | २१० | कोतवाल | २३८ |
| काळोखे | | २११ | कोराने | २३९ |
| किकवीकर | कि | २१२ | कोरेगांवकर | २४० |
| किनरे | | २१३ | कोल्हटकर श्री. | २४१ |
| किरकिरे | | २१४ | अ. | २४२ |
| किराणे | | २१५ | | २४३ |
| किरात | | २१६ | कोसंबी | २४४ |
| किर्लोसकर | | २१७ | | २४५ |
| कीर्तने | | २१८ | ख | २४६ |
| कीर्तीकर | | २१९ | खत्री | २४७ |
| कुंटे | | २२० | खरे | २४८ |
| कुरुंदवाडकर | | २२१ | खळतकर | २४९ |
| कुरुळकर | | २२२ | खळे | २५० |
| कुळकर्णी श्री. | | २२३ | खा | २५१ |
| ब. | | २२४ | खाडिलकर | २५२ |
| केटकर | | २२५ | | २५३ |
| केणीकोटकर | | २२६ | खांडेकर | २५४ |
| केपन | | २२७ | खातू | २५५ |
| केमकर | | २२८ | खारकर | २५६ |
| केरकरीण | | २२९ | खासगीवाले | २५७ |
| केल्वाडोने | | २३० | खि | २५८ |
| केसकर | | २३१ | खिडकीकर | २५९ |
| केळकर श्री. | | २३२ | | २६० |
| न. | | २३३ | खी | २६१ |
| | | २३४ | खु | २६२ |

खे २६३
खेडकर २६४
खेर २६५
खेसकर २६६
२६७
खो २६८
खोत २६९
२७०
खोपकर २७१
२७२
ग २७३
गज्जर २७४
गजेंद्रगडकर २७५
गणपुले २७६
गद्रे २७७
गधे २७८
गर्गे २७९
गद्रे २८०
गा
गांगनाईक २८१
गाडगीळ २८२
गाडेकर २८३
गांधी २८४
गायकवाड २८५
गारवडेकर २८६
ग्रांट डफ २८७
गांवस्कर २८८
गि २८९
गु २९०
गुजर २९१
गुर्जर २९२
गुंजीकर २९३
गुप्ते श्री. २९४
रा. २९५
गुरुजी २९६
गो
गोखरे २९७
गोखले श्री. २९८
न. २९९
गोगटे ३००
गोडबोले श्री. ३०१
न. ३०२
र. ३०३
३०४
गोडशे ३०५
गोत्री ३०६
गोंधळेकर ३०७
गोरे ३०८
गोलतकर ३०९
गोसावी ३१०
गोळे ३११
गौतम ३१२
घ ३१३
घगवे ३१४
३१५
घमंडे ३१६
घांघुरडे ३१७
घाटे ३१८

| | | | |
|---|---|---|---|
| घाणेकर | ३१९ | चौगुले | ३४७ |
| घारपुरे | ३२० | चौघुले | ३४८ |
| घि | ३२१ | चौधरी | ३४९ |
| घु | ३२२ | चौबळ | ३५० |
| घुमरे | ३२३ | चौहान | ३५१ |
| घो | ३२४ | छ | ३५२ |
| घोलकर | ३२५ | छत्रे | ३५३ |
| घोलप | ३२६ | | ३५४ |
| घोले | ३२७ | ज | ३५५ |
| घोसाळकर | ३२८ | जगताप | ३५६ |
| | ३२९ | जठार | ३५७ |
| च | ३३० | जडे | ३५८ |
| चव्हाण | ३३१ | जयतिलक | ३५९ |
| चा चांदेकर | ३३२ | जर्विस | ३६० |
| चांदोरकर | ३३३ | जव्हेरी | ३६१ |
| चापेकर | ३३४ | जा | ३६२ |
| चि चिखलगांवकर | ३३५ | जाधव | ३६३ |
| चिंचणकर | ३३६ | जांभेकर | ३६४ |
| चिटणीस श्री. | ३३७ | जामखेरकर | ३६५ |
| न. | ३३८ | जामदार | ३६६ |
| चितळे | ३३९ | जावजी | ३६७ |
| चित्रगुप्त | ३४० | जि | ३६८ |
| चिपळुणकर श्री. | ३४१ | जिनसेन आचार्य | ३६९ |
| द. | ३४२ | जु | ३७० |
| चो चोंचे | ३४३ | जुन्नरकर | ३७१ |
| चोभे | ३४४ | जो जोखेकर | ३७२ |
| | ३४५ | जोग | ३७३ |
| चौ | ३४६ | जोगळेकर | ३७४ |

| | | |
|---|---|---|
| जोशी अ. | | ३७५ |
| द. | | ३७६ |
| र. | | ३७७ |
| | झ | ३७८ |
| झळकीकर | | ३७९ |
| | ट | ३८० |
| | टा | ३८१ |
| | टि | ३८२ |
| टिकेकर | | ३८३ |
| | | ३८४ |
| टिपणीस | | ३८५ |
| टिंबले | | ३८६ |
| टिळू | | ३८७ |
| टिळक श्री. | | ३८८ |
| न. | | ३८९ |
| | टु | ३९० |
| टुळु | | ३९१ |
| टेकाडे | टे | ३९२ |
| | | ३९३ |
| टोकेकर | टो | ३९४ |
| | | ३९५ |
| टोपे | | ३९६ |
| टोळे | | ३९७ |
| ठकार | ठ | ३९८ |
| ठाकुरदास | ठा | ३९९ |
| | ठि | ४०० |
| | ठु | ४०१ |
| | ठो | ४०२ |
| ठोसर | | ४०३ |
| | | ४०४ |
| | ड | ४०५ |
| डॉक्टर | डा | ४०६ |
| | डि | ४०७ |
| | डु | ४०८ |
| | डे | ४०९ |
| | डो | ४१० |
| डोंगरे | | ४११ |
| | ढ | ४१२ |
| ढवळे | | ४१३ |
| तर्खडकर | त | ४१४ |
| तट्टू | | ४१५ |
| तटे | | ४१६ |
| तळवळकर | | ४१७ |
| तळेकर | | ४१८ |
| ताकभाते | ता | ४१९ |
| | | ४२० |
| ताटके | | ४२१ |
| ताडपत्रीकर | | ४२२ |
| तानपाठक | | ४२३ |
| तांबलेकर | | ४२४ |
| तांबे | | ४२५ |
| ताह्मणे | | ४२६ |
| तारळेकर | | ४२७ |
| तालचेरकर | | ४२८ |
| तांसगांवकर | | ४२९ |
| | ति | ४३० |

| | | | |
|---|---|---|---|
| तिरवडेकर | ४३१ | दिवे | ४५९ |
| त्रिलोकेकर | ४३२ | दिनकर | ४६० |
| तुकाराम तु | ४३३ | दिल्लीवाले | ४६१ |
| | ४३४ | दिवाडकर | ४६२ |
| तुळापुरकर | ४३५ | दिवाण | ४६३ |
| तेंडले ते | ४३६ | दिवेकर | ४६४ |
| तेलंगी | ४३७ | दिक्षित अ. | ४६५ |
| तैलंग | ४३८ | द. | ४६६ |
| तो | ४३९ | दु | ४६७ |
| थ | ४४० | दुदवडकर | ४६८ |
| थत्ते | ४४१ | दुभाषी | ४६९ |
| थळी | ४४२ | | ४७० |
| | ४४३ | दे | ४७१ |
| द | ४४४ | देव | ४७२ |
| दत्तमहाराज | ४४५ | देवकुळे | ४७३ |
| दप्तरदार | ४४६ | देवधर | ४७४ |
| दयानंद सरस्वती | ४४७ | देवल | ४७५ |
| द्रवीड | ४४८ | देवस्थळी | ४७६ |
| दळवी | ४४९ | देशपांडे | ४७७ |
| दांडेकर दा | ४५० | देशमुख श्री. | ४७८ |
| दातार | ४५१ | ब. | ४७९ |
| दाते श्री. | ४५२ | देसाई | ४८० |
| र. | ४५३ | दो | ४८१ |
| दाबक | ४५४ | दोबे | ४८२ |
| दाभोळकर | ४५५ | | ४८३ |
| दामले अ. | ४५६ | ध | ४८४ |
| ब. | ४५७ | धनुर्धारी | ४८५ |
| दि | ४५८ | धनेश्वर | ४८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| धर्माधिकारी | ४८७ | नागपुरकर | ५१५ |
| धराधर | ४८८ | नागवेकर | ५१६ |
| धा | ४८९ | नागांवकर | ५१७ |
| धामणकर | ४९० | | ५१८ |
| धामणस्कर | ४९१ | नाटककर्ता | ५१९ |
| धारप | ४९२ | नाटेकर श्री. | ५२० |
| धारूरकर | ४९३ | ब. | ५२१ |
| धिरोभक्त धि | ४९४ | नाट्यकला प्रवर्तक | ५२२ |
| धु | ४९५ | नाडकर्णी | ५२३ |
| धुमाळ | ४९६ | नातू | ५२४ |
| धुरंधर | ४९७ | नाथमाधव | ५२५ |
| धो | ४९८ | नानल | ५२६ |
| धोडंबकर | ४९९ | नाबर | ५२७ |
| धोंड | ५०० | नामजोशी | ५२८ |
| धोपेश्वरकर | ५०१ | नामदेव महाराज | ५२९ |
| न | ५०२ | नाशिककर | ५३० |
| नकुळ | ५०३ | नि | ५३१ |
| नगरकर श्री. | ५०४ | निगुडकर | ५३२ |
| ब. | ५०५ | निर्गुढे | ५३३ |
| नंदुरबारकर | ५०६ | | ५३४ |
| नरगुंदकर | ५०७ | निटवे | ५३५ |
| नवरे | ५०८ | | ५३६ |
| नवलकर | ५०९ | निमकर | ५३७ |
| नवाथे | ५१० | निरंजन कवि | ५३८ |
| नाइक अ. ना. | ५११ | निळोबा महाराज | ५३९ |
| र. | ५१२ | न्यु. इ. स्कुल | ५४० |
| नाईटक्लब | ५१३ | ने | ५४१ |
| नाखरे | ५१४ | नेने श्री. | ५४२ |

मराठी ग्रंथ ... ठा.
वा. क्र. 9288
संग्रह शाखा ...


| | |
|---|---|
| र. | ६४३ |
| नेवाळकर | ६४४ |
| नेसबित् रॉबर्ट | ६४५ |
| नो | ६४६ |
| प | ६४७ |
| पटवर्धन श्री. | ६४८ |
| न. | ६४९ |
| व. | ६५० |
| पडलवारू | ६५१ |
| पंडित श्री. | ६५२ |
| क, | ६५३ |
| ब. | ६५४ |
| म. | ६५५ |
| वि. | ६५६ |
| पंडिता रमाबाई | ६५७ |
| पतकी | ६५८ |
| पदे | ६५९ |
| प्रधान श्री. | ६६० |
| न. | ६६१ |
| | ६६२ |
| प्रभू | ६६३ |
| | ६६४ |
| प्रवासी | ६६५ |
| पर्वते | ६६६ |
| परचुरे | ६६७ |
| | ६६८ |
| परदेशी | ६६९ |
| परब | ६७० |
| परशुराम कवी | ६७१ |
| परळकर | ६७२ |
| परांजपे श्री. | ६७३ |
| ल. | ६७४ |
| | ६७५ |
| परुळेकर | ६७६ |
| पवार | ६७७ |
| | ६७८ |
| पळशे | ६७९ |
| पा. | ६८० |
| पागनीस | ६८१ |
| पांगरीकर | ६८२ |
| | ६८३ |
| | ६८४ |
| पाटकर | ६८५ |
| पाटणकर | ६८६ |
| पाटसकर | ६८७ |
| पाटील | ६८८ |
| पाठक | ६८९ |
| पाडारे | ६९० |
| पाठे | ६९१ |
| पांडे | ६९२ |
| पाध्ये | ६९३ |
| पाबळकर | ६९४ |
| पारख | ६९५ |
| पारनाईक श्री. | ६९६ |
| ब. | ६९७ |
| पारसनीस | ६९८ |

पालवणकर ५९९
पावगी ६००
पांवसकर ६०१
पाळंदे ६०२
पांगळ ६०३
पिंगुळकर पिं. ६०४
६०५
पिठले ६०६
पितळे ६०७
पित्रे ६०८
६०९
पुंडले पुं. ६१०
पुणेकर ६११
६१२
पुराणिक ६१३
पुरातन इतिहास प्र. मं. ६१४
६१५
पे. ६१४
पेची फिप्सन ६१७
६१८
पेटे ६१९
पेंडसे के. ६२०
य. ६२१
पेढे ६२२
६२३
पेशवे ६२४
पेस्तनजी दोराबजी ६२५
पै. ६२६
६२७
पैठणकर ६२८
६२९
पोकशे पो. ६३०
६३१
पोतदार ६३२
पोतनीस ६३३
६३४
फ. ६३५
फडके श्री. ६३६
भ. ६३७
६३८
फडणीस ६३९
६४०
फणसलकर ६४१
६४२
फलटणकर ६४३
फळणीकर ६४४
फा. ६४५
फाळके ६४६
फि. ६४७
फु. ६४८
फुले ६४९
फो. ६५०
ब. ६५१
बडोदेकर ६५२
बढावकर ६५३
६५४

| | | | |
|---|---|---|---|
| बनहट्टी | ६५५ | बेडें | ६८३ |
| | ६५६ | बेदरकर श्री. | ६८४ |
| बर्वे | ६५७ | ब. | ६८५ |
| बरवे | ६५८ | बेलवलकर | ६८६ |
| बऱ्हाणपुरकर | ६५९ | बेलसर श्री. | ६८७ |
| बा. | ६६० | ख. | ६८८ |
| बाण | ६६१ | ग. | ६८९ |
| बाणभट | ६६२ | बेहेरे | ६९० |
| | ६६३ | बो. | ६९१ |
| बापट श्री | ६६४ | बोडस | ६९२ |
| न. | ६६५ | | ६९३ |
| व. | ६६६ | बोंद्रे | ६९४ |
| बावरे | ६६७ | | ६९५ |
| बात्रा पदमजी | ६६८ | भ. | ६९६ |
| | ६६९ | भट | ६९७ |
| बि. | ६७० | भडभडे | ६९८ |
| बिजितकर | ६७१ | भर्तृहरी | ६९९ |
| बिजुटकर | ६७२ | | ७०० |
| बिजें | ६७३ | भा. | ७०१ |
| बिडकर | ६७४ | भांगले | ७०२ |
| | ६७५ | भागवत श्री | ७०३ |
| बिनसले | ६७६ | न. | ७०४ |
| बु | ६७७ | ब. | ७०५ |
| बुधवडकर | ६७८ | भाजेरे | ७०६ |
| बुधकर | ६७९ | भाटवडेकर | ७०७ |
| बुधपांचेगांवकर | ६८० | भाटे | ७०८ |
| बे बे | ६८१ | | ७०९ |
| बेंजामिन | ६८२ | भांडारकर | ७१० |

भांडारी ७११
भांडारे ७१२
भानप ७१३
भानू ७१४
७१५
भांबुरकर ७१६
७१७
भालचंद्र ७१८
भालेकर ७१९
भावशर्मा ७२०
भावे ७२१
७२२
भिं. ७२३
भिंगारकर ७२४
भिडे श्री. ७२५
ब. ७२६
व. ७२७
७२८
भिलवडीकर ७२९
भी. ७३०
भीमस्वामी ७३१
भे. ७३२
भेंडे ७३३
७३४
भो. ७३५
भोपे ७३६
७३७
भोर ७३८
भोसकर ७३९
भोळे ७४०
म. ७४१
मटंगे ७४२
मंडलीक श्री. ७४३
ब. ७४४
मतकरी ७४५
मंत्री ७४६
मनोहर ७४७
७४८
मयूर कवि ७४९
मराठी कविमंडळ ७५०
मराठे ७५१
मलय्या ७५२
म्हाले ७५३
महाजन श्री. ७५४
ब. ७५५
महात्मे ७५६
महीपति ७५७
मा. ७५८
माकोडे ७५९
७६०
माटे ७६१
माडगावकर ७६२
मांडे ७६३
७६४
माधवदास ७६५
माधवानुज ७६६

| | | | |
|---|---|---|---|
| माने | ७६७ | य. | ७९५ |
| मालवणकर | ७६८ | यवतेश्वरकर | ७९६ |
| मालु | ७६९ | यशोदातनय | ७९७ |
| | ७७० | यळवडे | ७९८ |
| मि. | ७७१ | याज्ञी या. | ७९९ |
| मित्र | ७७२ | येरंडोलकर | ८०० |
| | ७७३ | यंदे | ८०१ |
| मु. | ७७४ | र. | ८०२ |
| मुक्तेश्वर | ७७५ | रंगनाथस्वामी | ८०३ |
| मुकादम | ७७६ | रघुनाथ पंडित | ८०४ |
| मुकुंदराज | ७७७ | रणजित | ८०५ |
| मुजूमदार | ७७८ | रणदिवे | ८०६ |
| मुनसिफ | ७७९ | रविवर्मा | ८०७ |
| मुंबईकर | ७८० | रहाळकर | ८०८ |
| मुरकर | ७८१ | राऊत रा. | ८०९ |
| मुसळे | ७८२ | | ८१० |
| मुळे | ७८३ | राजपुरकर | ८११ |
| मो. | ७८४ | राजमाचीकर | ८१२ |
| मोघे | ७८५ | राजवाडकर | ८१३ |
| मोडक श्री. | ७८६ | राजवाडे | ८१४ |
| ब. | ७८७ | राजाध्यक्ष | ८१५ |
| | ७८८ | राजारामियन | ८१६ |
| मोरे | ७८९ | राजे | ८१७ |
| मोरोपंत | ७९० | राजोपाध्ये श्री. | ८१८ |
| मोहोळकर | ७९१ | रा. | ८१९ |
| मौ. | ७९२ | राणे | ८२० |
| मौलाबक्ष | ७९३ | राधारमण | ८२१ |
| | ७९४ | रानडे श्री. | ८२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| म. | ८२३ | लोकहितवादी | ८५१ |
| रामजोशी | ८२४ | लोहकरे | ८५२ |
| रामदास | ८२५ | व. | ८५३ |
| रामानंद | ८२६ | वझे | ८५४ |
| रामी रामदास | ८२७ | वणीकर | ८५५ |
| राव | ८२८ | वर्तक | ८५६ |
| राशिवडेकर | ८२९ | वर्दे | ८५७ |
| रि. | ८३० | वसईकर | ८५८ |
| रिसबुड | ८३१ | वळसंगकर | ८५९ |
| | ८३२ | वळे | ८६० |
| रे. | ८३३ | वाकणकर वा. | ८६१ |
| रेगे | ८३४ | वागळे | ८६२ |
| रेघे | ८३५ | वाडेकर | ८६३ |
| रोकडे रो. | ८३६ | वानखडे | ८६४ |
| | ८३७ | वामन पंडित | ८६५ |
| ल. | ८३८ | व्यास | ८६६ |
| ला. | ८३९ | वाळावलकर | ८६७ |
| लाड | ८४० | वालेवालकर | ८६८ |
| लाटे | ८४१ | वावीकर | ८६९ |
| लाळे | ८४२ | वाळिंबे | ८७० |
| लि. | ८४३ | वि. | ८७१ |
| लिंबगावकर | ८४४ | विजापुरकर | ८७२ |
| लिमगांवकर | ८४५ | विठ्ठलकवि | ८७३ |
| लिमये | ८४६ | विवेकानंद स्वामी | ८७४ |
| लुकतुके लु. | ८४७ | विरकर | ८७५ |
| लेंभे ले. | ८४८ | वे. | ८७६ |
| लेले श्री. | ८४९ | वेणी गिरिधर | ८७७ |
| लो. | ८५० | वैद्य वै. | ८७८ |

| | |
|---|---|
| वैद्य | ८७९ |
| शंकराचार्य श. | ८८० |
| शर्मा | ८८१ |
| शहामुनि | ८८२ |
| शा. | ८८३ |
| शारदाश्रमवासी | ८८४ |
| शालीग्राम | ८८५ |
| शास्त्री | ८८६ |
| शाह | ८८७ |
| शि. | ८८९ |
| शिंगणे | ८९० |
| शिंदे | ८९१ |
| शिदोरे | ८९२ |
| शिरवलकर | ८९३ |
| शिवशक्ति | ८९४ |
| शुभानन्दस्वामी | ८९५ |
| शे. | ८९६ |
| शेट | ८९७ |
| शेंडे | ८९८ |
| शेणवी | ८९९ |
| | ९०० |
| शेंबेकर | ९०१ |
| | ९०२ |
| शेरे | ९०३ |
| शेलके | ९०४ |
| शो. | ९०५ |
| शौ. | ९०६ |
| शौचे | ९०७ |
| | ९०८ |
| सकपाळ स. | ९०९ |
| | ९१० |
| संगमनेरकर | ९११ |
| सच्चिदानंद स्वामी | ९१२ |
| सज्ञगिरी | ९१३ |
| सडेकर | ९१४ |
| सत्कार्योत्तेजक सभा | ९१५ |
| संतान | ९१६ |
| स्पष्टवक्ते | ९१७ |
| सबनीस | ९१८ |
| सभासद | ९१९ |
| समर्थ | ९२० |
| सरंजामे | ९२१ |
| सरदेसाई श्री. | ९२२ |
| ग. | ९२३ |
| | ९२४ |
| सरनाईक | ९२५ |
| सरस्वतीनंदन | ९२६ |
| स्वदेशाभिमानी | ९२७ |
| स्वधर्महितेच्छु | ९२८ |
| सहविचारिणी सभा | ९२९ |
| सहस्रबुद्धे | ९३० |
| साखरे सा. | ९३१ |
| साठे श्री. | ९३२ |
| ब. | ९३३ |
| सांडू | ९३४ |
| सातवळेकर | ९३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| सातारकर | १३६ | हरबरे | १६४ |
| साधले | १३७ | हरडीकर | १६५ |
| साने | १३८ | हरिपुरकर | १६६ |
| सापकर | १३९ | | १६७ |
| सि. | १४० | हवालदार | १६८ |
| सिंधु | १४१ | | १६९ |
| सिमियन | १४२ | हळबे | १७० |
| सु. | १४३ | हा. | १७१ |
| सुबंधु | १४४ | हातवळणेकर | १७२ |
| सुभानंत स्वामी | १४५ | हारडीकर | १७३ |
| सुभेदार | १४६ | हि हि. | १७४ |
| सुरतकर | १४७ | हितचिंतक | १७५ |
| सुळे | १४८ | हितेच्छु | १७६ |
| सो. | १४९ | हितोपदेशक | १७७ |
| सोनगडकर | १५० | हिंदळेकर | १७८ |
| सोमवंशी | १५१ | हिंदु युनियन | १७९ |
| सोलापुरकर | १५२ | हु. | १८० |
| सोवनी | १५३ | हुपरीकर | १८१ |
| सोहनी श्री. | १५४ | हुबळीकर | १८२ |
| म. | १५५ | हे. | १८३ |
| सोळंकर | १५६ | हेळेकर | १८४ |
| ह. | १५७ | हो. | १८५ |
| हडकर | १५८ | होनाजी | १८६ |
| हडपसरकर | १५९ | हंस | १८७ |
| हर्डीकर | १६० | हंसबाडिकर | १८८ |
| हतवळणे | १६१ | | १८९ |
| हनुमंतस्वामी | १६२ | क्ष. | १९० |
| | १६३ | क्षीरसागर | १९१ |

ज्ञ. ११२
ज्ञा. ११३
ज्ञानदेव ११४
ज्ञानेश्वर ११५
११६

# वर्गीकरण-पद्धतीविषयीं कांहीं माहिती.

(१) मुख्य विषय-विभागाखालील कित्येक उप-विभाग कित्येक ठिकाणीं भरलेले नाहींत असें आढळून येईल. ह्याचें कारण असें की सध्यां तरी त्या विषयांत अधिक उप-विभाग करण्याची जरूरी नाहीं. मराठी वाङ्मयाची वाढ नुकतींच होऊं लागली असल्या-मुळें तिसऱ्या वर्गीकरण-पद्धतींतील सर्वच उप-विभागावर मराठींत पुस्तकें लिहिलेलीं सांपडतीलच असें सांगतां येत नाहीं. कांहीं कालानें वाङ्मयाची वाढ अधिक झाल्यावर जर प्रत्येक विषयाच्या अनेक उप-विभागावर पुस्तकें लिहिण्यांत आलीं तर आतां जे उप-विभाग भरलेले नाहींत ते उपयोगांत आणावेत. उदाहरणार्थ, **ख—मानसशास्त्र व गुप्तविद्या** ह्या विषयाचे सध्यां फक्त तीनच उपविभाग केलेले आहेत. ह्या विषयावर मराठी भाषेंत जर कालांतरानें बऱ्याच ग्रंथांचा भरणा झाला तर सध्यां न घेतलेले उप-विभाग म्हणजे खु, खू, खे, खै, वगैरे उपयोगांत आणावेत.

(२) प्रत्येक विषयाचा प्रथम उप-विभाग ‘ सर्वसाधारण ’ सदरासाठीं व शेवटचा उप–विभाग “ किरकोळ ” ह्या सदरासाठीं राखून ठेवण्यांत आला आहे असें आढळून येईल. हे दोन उप-विभाग फार महत्त्वाचे व सोईचे आहेत; कारण ज्या ग्रंथाचें विवरण सर्वसाधारण प्रकारचें आहे, म्हणजे जो ग्रंथ निश्चित इतर कोणत्याही उपविभागांत घालतां येत नाहीं तो ग्रंथ त्या ‘ सर्वसाधारण ’ सदराखालीं घालावा. असें पुष्कळ ग्रंथ भाषेंत असतात कीं, ज्यामध्यें एका विषयाच्या एका उप-विभागाचेंच विवेचन केलेलें नसून मुख्य विषयाच्या अनेकविध अंगाचें निरूपण एकत्र केलेलें असतें, अशा ग्रंथांना ह्या ‘ सर्वसाधारण ’ सदरांत घालावेत. शेवटचें ‘ किरकोळ ’ म्हणून जें सदर आहे त्यांत असे

ग्रंथ घालावेत कीं ज्यांना वरील इतर उप-विभाग लागूं पडत नाहींत, म्हणजे जे ग्रंथ सर्वसाधारण प्रकारचे तर नाहींत व इतर दिलेल्या विभागांतही घालतां येत नाहींत अशा ग्रंथांसाठीं हें सदर आहे. समजा कीं ' धर्म ' ह्या विषयांत पुढें असें एखादें नवीन व अपूर्व धर्ममत निघालें कीं ज्याचा ' धर्म ' ह्या सदराखालील कोणत्याही उपविभागांत अंतर्भाव करतां येत नाहीं, तर अशा धर्ममताच्या पुस्तकास शेवटच्या ' **किरकोळ** ' ह्या सदरांत घातले पाहिजे.

( ३ ) कित्येक विषय एकाहून अधिक सदरांत अंतर्भूत केलेले सांपडतील; उ०-' मद्यपाननिषेध ', ' बहुपत्नीकत्व '. तेव्हां ह्या विषयांवरील पुस्तकें निश्चित कोणत्या सदरांत--नीति किंवा समाजशास्त्र ह्यांत--घालावीं असा जेव्हां प्रश्न येईल तेव्हां त्या पुस्तकांचें प्रतिपादन नीतीच्याच दृष्टीनें केलेलें आहे किंवा समाजाच्या चालीरीतींच्या दृष्टीनें केलेलें आहे हें निश्चित करून मग तीं पुस्तकें ' नीति ' किंवा ' समाजशास्त्र ' ह्या सदरांत घालावींत.

( ४ ) समजा कीं, तिसऱ्या वर्गीकरणपद्धतींत सध्यां दिलेल्या एखाद्या उप-विभागावर जर पुढें इतकीं पुस्तकें लिहिलीं गेलीं कीं त्या सर्वांना तें एकच सदर देणें म्हणजे त्या पुस्तकांच्या अनेकविध अंगांचें मिश्रण करणें असें वाटलें तर त्या उप-विभागांचे पुनः दुसरे उप-विभाग, जसे—' गी १ ', ' गी २ ', ' गी ३ ', असे—करतां येतात. उदाहरणार्थ—' इतिहास ' ह्या सदराखालीं दोन दोन, तीन तीन, देशांचा अंतर्भाव कित्येक ठिकाणीं एकाच उप-विभागांत केलेला आहे; तेथें त्या उप-विभागांचे आणखीं नऊ उप-विभाग करून त्यांतील पहिले २ किंवा ३ एका देशासाठीं राखून ठेवावेत, दुसरे दोन तीन दुसऱ्या देशासाठीं, व राहिलेले इतर देशासाठीं.

कोणत्याही विभागाचे नऊच उपविभाग करावेत व १२, १३, २० असें करूं नयेत असें वर म्हटलें त्याचें कारण ही विभाग-पद्धति दशांश पद्धतीवर बसविलेली आहे, म्हणून नवापेक्षां अधिक उप-विभाग करतां येत नाहींत. जसें:--' क्षु ' ह्या सदराचे ' क्षु २ ' असा एक उप-विभाग केला तर त्याचीं पुनः जर आणखी लहान सदरें पाडणें भाग पडल्यास--क्षु २१, क्षु २२, क्षु २३, क्षु २४ ते क्षु २९ पर्यंत पाडतां येतील. पुनः ' क्षु २१' ह्या सदराचें क्षु २११, क्षु २१२, क्षु २१३ अशीं आणखी लहान सदरें पाडतां येतील. म्हणून कोणत्याही सदराचीं नवापेक्षां अधिक लहान सदरें पाडूं नयेत, पाडल्यास २१ ( एकवीस ) ह्या स्वतंत्र सदराचा २ ( दोन ) ह्या सदराचीं २·१, २·२, २·३, २·४ अशीं आणखीं सदरें पाडल्यावर त्यांच्याशीं घोंटाळा होण्याचा संभव आहे; कारण वरील वर्गीकरणांत दशांश चिन्ह ( · ) लिहिण्याची चाल नाहीं.

# पुस्तकांचे वर्गीकरण कसें करावें.

पुस्तकांचें वर्गीकरण करतांनां प्रथम त्याची प्रस्तावना, विषयानुक्रमणिका व आंतील कांहीं पानें वाचून तें पुस्तक नक्की कोणत्या विषयांत जाऊं शकेल हे ठरवावें. प्रस्तावना वगैरे वाचण्याचें कारण पुस्तकाच्या निव्वळ नांवावरून त्याचा विषय खात्रीनें ठरवितां येत नाहीं. अनुक्रमणिकेवरून पुस्तकांतील विषय एकच आहे, किंवा त्यांत एकापेक्षां अधिक विषय आले आहेत हें समजतें. प्रस्तावना व अनुक्रमणिका ह्या दोहोंवरून जर विषय निश्चित झाला नाहींच तर आंतील विषय-प्रतिपादनाकडे लक्ष्य देऊन विषय निश्चित केला पाहिजे. नंतर त्या विषयाला वर्गीकरण पद्धतींत दिलेल्या सांकेतिक अक्षरांपैकीं कोणतें अक्षर लागूं पडतें हें पाहून तें सांकेतिक अक्षर वर्गांक लिहितांनां प्रथम लिहावें.

ह्या नंतर शेवटीं दिलेल्या अंकानुक्रमणिकेंत त्या पुस्तकाच्या कर्त्याच्या उपनांवापुढें कोणती संख्या किंवा नंबर आहे तो पाहून वर दर्शविलेलें सांकेतिक वर्गाक्षर पूर्णांक समजून अंकानुक्रमणिकेंतील कर्त्याचा नंबर (संख्या) अंशस्थानाच्या जागीं लिहावा.

दिलेली अंकानुक्रमणिका संपूर्ण आहे असें ह्मणतां येत नाहीं; कारण कोणत्याही वाङ्मयाची वाढ होत असतांनां अशा प्रकारची कर्त्यांच्या नांवांची अंकानुक्रमणिका परिपूर्ण करणें शक्य नाहीं; ह्मणून जर कदाचित एखाद्या कर्त्याचें नांव अंकानुक्रमणिकेंत दिलेलें नसलें तर त्या ग्रंथकर्त्याच्या नांवाचीं कांहीं आद्याक्षरें घेऊन त्याचें नांव अंकानुक्रमणिकेंत कोठें येऊं शकलें असतें ह्याचा नक्की विचार करावा, व त्या जागीं जो नंबर दिलेला असेल तो नंबर उपयोगांत आणावा. उदाहरणार्थः—केतकर यांचे " संकीर्ण लेख. " " केतकर "

हें नांव अंकानुक्रमणिकेंत दिलेलें नाहीं; तरी अंकानुक्रमणिका नांवांच्या आद्याक्षरांनुक्रमाप्रमाणें तयार केलेली असल्यामुळें ' केतकर ' हे नांव ' केणीकोटकर ' २२६ व ' केपन ' २२७ ह्या दोन नांवाच्या मध्यें यावयास पाहिजे, व ' केपन ' ह्या नांवाचा नंबर ' केतकर ' ह्या नांवानंतर येत असल्या कारणानें त्यापूर्वीचा ह्मणजे ' केणीकोटकर ' चा नंबर २२६ हाच ' केतकर ' ह्या नांवाचा नंबर समजावा. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे २२६ हा नंबर फक्त ' केणीकोटकर ' ह्याच नांवाचा नसून ' केणी ' पासून ' केप ' पर्यंत ज्या ज्या नावांचीं आद्याक्षरें येऊं शकतात त्या त्या नांवांना लागूं पडणारा आहे. अशा रीतीनें जीं नांवें अनुक्रमणिकेंत सांपडणार नाहींत त्यांचे नंबर शोधून काढावेंत.

अंशस्थानाच्या जागीं ग्रंथकर्त्याचा नंबर घातल्यावर त्याच पद्धतीनें पुस्तकाच्या नावाचा नंबर शोधून काढून तो छेदस्थानीं लिहावा.

अशा रीतीनें पुस्तकाच्या विषयाचें सांकेतिक अक्षर हा पूर्णांक, कर्त्याच्या नांवाचा नंबर हा अंश व पुस्तकाच्या नांवाचा नंबर हा छेद असे तीन मिळून झालेला अंक हा पुस्तकाचा संपूर्ण " वर्गाङ्क " झाला असें समजावें. उदाहरणार्थः—ह. ना. आपटे कृत ' उषःकाल ' हें पुस्तक कादंबरी असल्यामुळें कादंबरी विषय दर्शविणारे सांकेतिक अक्षर **य** घेऊन त्याच्या पुढें आपटे, ह. ना. ह्या नांवाचा अंकानुक्रमणिकेंतील नंबर १४२ आहे तो घ्यावा व तो अंशस्थानीं मांडून छेदस्थानीं ' उषःकाल ' शब्दाचा अंकानुक्रमणिकेंतील नंबर १६४ हा मांडावा; म्हणजे ह्या पुस्तकाचा **य** १४२/१६४ हा संपूर्ण वर्गाङ्क झाला. आतां पुस्तकाच्या नांवाचा नंबर देण्याचा उद्देश फक्त एकाच ग्रंथकर्त्याचीं पुस्तकें त्यांच्या (पुस्तकांच्या) नांवांच्या आद्याक्षरांनुक्रमानेंच कपाटांत रचिलीं जावींत असा असल्यामुळें व अनुक्रमणिकेंतील नंबर दशांश पद्धतीवर योजिले असल्यामुळें, पुस्तकाच्या नांवाचा संपूर्ण तीन अंकी नंबर न घेतां पहिले

दोन अंकच घेतलें तरी चालण्यासारखें आहे; म्हणजे य $\frac{१४२}{१६}$ असा त्या पुस्तकाचा संपूर्ण वर्गांक दिला तरी चालेल.

अधिक विस्तृत वर्गीकरण-पद्धतींतील नंबर ह्याच पुस्तकास द्यावयाचा असल्यास तो " यु $\frac{१४२}{१६४}$ " असा होईल; कारण " उषःकाल " ही ऐतिहासिक कादंबरी असल्यामुळें त्या विषयाचें अक्षर ' यु ' हें आहे.

अपवादः—जर एखादें पुस्तक एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीवर चरित्रात्मक किंवा टीकात्मक असेल तर अंशस्थानाच्या जागीं त्या व्यक्तीच्या उपनांवाचा नंबर देऊन छेदस्थानीं तें पुस्तक लिहिणाऱ्याचा ( कर्त्याचा ) नंबर द्यावा; असें केलें असतां एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची चरित्रात्मक किंवा टीकात्मक पुस्तकें कपाटांत एकाच ठिकाणीं येऊं शकतील.

वर दर्शविल्याप्रमाणें पुस्तकांना वर्गाङ्क दिले असतां विशेष फायदे असे होतात कीं:—

( १ ) ज्या त्या विषयावरील पुस्तकें त्या त्या विषयाच्या एकाच सदरांत कर्त्यांच्या आद्याक्षरांनुक्रमानें रचतां येतात; ( २ ) तसेंच एकाच कर्त्यानें एकाच विषयावर लिहिलेलीं सर्व पुस्तकेंहीं एकाच ठिकाणीं येऊन तीं त्यांच्या ( पुस्तकांच्या ) आद्याक्षरांनुक्रमानें रचिलीं जातात.

## कार्ड कॅटलॉग कसा तयार करावा.

पुस्तकालयांतील पुस्तकांचा कॅटलॉग(यादी) एकदां छापून काढला म्हणजे एखादें नवीन पुस्तक पुस्तकालयांत घेतल्यावर तें छापलेल्या कॅटलॉगांत योग्य जागीं घालतां येणें शक्य नसतें, म्हणून "कार्ड कॅटलॉग" ठेवणें विशेष सोईस्कर असतें; कारण सर्व कार्डें कर्त्यांच्या किंवा पुस्तकांच्या नांवांच्या आद्याक्षरांप्रमाणें जुळविलीं तरी नवीन पुस्तकाचें तयार केलेलें कार्ड इतर कार्डांमध्यें योग्य त्याच जागीं घालतां येतें. खालीं दर्शविल्याप्रमाणें प्रत्येक पुस्तकाला तीन तीन कार्डें तयार केलीं असतां तीन प्रकारचे कॅटलॉग तयार होऊन लायब्ररीयनचे व वाचकांचे काम विशेष सुलभ होते.

कार्ड तयार करतांनां खालील प्रकारचीं कार्डें घेऊन त्यांच्या डाव्या बाजूच्या वरील कोपऱ्यांत पुस्तकाचा वर्गाङ्क लिहावा, त्याच्यापुढें त्याच ओळींत कर्त्याचें नांव लिहावें, नंतर त्याच्या खालील ओळींत पुस्तकाचें नांव लिहावें, आणि उजव्या बाजूच्या खालील कोपऱ्यांत पुस्तकाच्या प्रसिद्धीचें स्थळ व वर्ष लिहावें.

### कर्तृदर्शक कार्डाचा नमुना.

| | |
|---|---|
| युं १४२/१६ | आपटे, हरी नारायण. |
| | उषःकाल. |
| | पुणें १९११ |

अशा रीतीनें पुस्तकाचें कर्तृदर्शक-कार्ड ( Author Card ) तयार होईल, व अशीं कार्डें कर्त्यांच्या नांवांच्या आद्याक्षरांप्रमाणें जुळविलीं असतां " कर्तृदर्शक-अथवा कर्तावार कॅटलॉग " ( Author Catalogue ) तयार होईल; आणि त्यावरून एखाद्या कर्त्यानें लिहिलेलें अमुक पुस्तक पुस्तकालयांत आहे किंवा नाहीं हें लगेंच सांगतां येईल.

कर्तृदर्शक कार्ड तयार झाल्यावर पुस्तकाच्या नांवाचें-" ग्रंथनाम-दर्शक- " ( Title ) कार्ड तयार करावें. हें कार्ड पूर्वी सांगितलेल्या कर्तृदर्शक कार्डाप्रमाणेंच तयार करावयाचें, परंतु त्यांत फरक इतकाच कीं कर्त्याच्या जागीं पुस्तकाचें नांव व पुस्तकाच्या जागीं कर्त्याचें नांव घालावें.

ग्रंथनामदर्शक कार्डाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| युं $\frac{१४२}{१६}$ | उषःकाल | |
| | आपटे, हरी नारायण. | |
| | | पुणें. १९११ |

हीं कार्डें पुस्तकांच्या नांवांच्या आद्याक्षरांप्रमाणें जुळविलीं असतां " ग्रंथनामदर्शक-अथवा नामवार-कॅटलॉग " तयार होईल; आणि अमुक नांवाचें पुस्तक पुस्तकालयांत आहे किंवा नाहीं, हें त्यांवरून लागलींच सांगतां येईल. पुस्तकाचें नांव लिहितांनां ' श्री ' वगैरे सारखे औपचारिक शब्द गाळून टाकावेत.

अशा रीतीनें " ( १ ) अमुक कर्त्याचें पुस्तक किंवा ( २ ) अमुक नांवाचें पुस्तक पुस्तकालयांत आहे कां ? " अशा दोन प्रश्नांना बिनचूक उत्तर देणारे दोन कॅटलॉग तयार झाल्यानंतर अमुक एका

विषयावर पुस्तकालयांत कोणकोणतीं पुस्तकें आहेत अशा प्रश्नाचें समाधान करणारा तिसरा विषयवार कार्डांचा "विषय-दर्शक" ( Subject Catalogue) कॅटलॉग तयार करणें इष्ट आहे. ह्या कॅटलॉगाचीं कार्डें कर्तृदर्शक कार्डांप्रमाणेंच तयार करावींत, परंतु तीं जुळवितांना मात्र विषयवार जुळवावींत; ह्मणजे एकाच विषयाचीं सर्व कार्डें एकाच ठिकाणीं लावून तीं कर्त्यांच्या आद्याक्षरांप्रमाणें जुळवावींत. अशा रीतीनें जो कॅटलॉग तयार होईल तो विषयदर्शक किंवा विषयवार कॅटलॉग समजावा. ह्या कॅटलॉगावरून अमुक एका विषयावर कोणत्या कर्त्यांचीं कोणकोणतीं पुस्तकें आहेत हें ताबडतोब सांगतां येईल.

---